# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/01/2023 (सोमवार) दुपार


---

### दुखापत

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत मोहगाव येथे दिनांक ०८/०१/२०२३ चे १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– दिलीप भिवाजी वानखेडे, वय ५५ वर्ष, रा. मोहगाव हे आपल्या घरी हजर असता फिर्यादीचे वडील नामे– भिवाजी वानखेडे यांना फिर्यादीने जेवण मागितले असता फिर्यादीच्या घरा शेजारी राहणारा चुलत भाऊ आरोपी नामे– नंदु शिवाजी वानखेडे, रा. मोहगाव ता. मौदा जि. नागपूर हा आला व फिर्यादीच्या वडिलांना म्हणाला कि ''तुम्ही याला जेवण दयाचे नाही'' असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळी करुन हातबुक्यांनी मारहाण केली व उजव्या खांदयावर, मनगटावर व डोक्यावर काठीने मारले व डाव्या हाताच्या अंगठयाला जखम होवुन रक्त निघुन ''तू येथे राहशिल तर तुला जिवाने मारुन टाकिल'' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस शिपाई राजू आंधळे मो. नं. ८२०८८७४६६५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**